

# कथासरित्सागर

महाकवि गुणाढ्य

प्र. शं. जोशी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
IRBK-0106275
IRBK-0106275

# महाकवि गुणाढ्य

22803
ठाणे, वाचनालय शाखा
नों. वि
IRBK-0106275
IRBK-0106275

प्र. शं. जोशी

५० नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे

पहिली आवृत्ति : १९५७
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धनकवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकं लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानं आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोंत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद, यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

प्रस्तुत पुस्तकांतील गुणाढ्याची कथा 'कथासरित्सागरां'-तील पहिल्या लंबकांतून घेतली आहे. तीमध्यें गुणाढ्याच्या तीन जन्मांची माहिती आली आहे. पहिल्या जन्मीं तो 'सोमदेव' नांवाचा एक ब्राह्मणपुत्र होता. आपल्या तपश्चर्येच्या जोरावर तो पुढच्या जन्मीं 'माल्यवान्' नांवाचा एक गण बनला. पण पार्वतीच्या शापा-मुळें त्याला मृत्युलोकांत अवतार घ्यावा लागला व तो 'गुणाढ्य' या नांवानें प्रसिद्धीस आला. शंकरांनीं पार्वतीला सांगितलेल्या विद्याधरांच्या गोष्टी लिहून त्यानें, आपली 'बृहत्कथा' अत्यंत लोकप्रिय बनविली व तो पुनः शंकराचा गण बनला. गुणाढ्याच्या या कथेची गुंफण जास्तींत जास्त यथार्थतेनें व अधिक कलात्मक रीतीनें करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. या कथेवरून त्याच्या महाकवित्वाची कल्पना वाचकांना येईल.

— अनुवादक

22807
11.8.13
C02

# महाकवि गुणाढ्य

## गोविंददत्ताचा संसार

जवळ जवळ दोन हजार वर्षे होत आलीं या गोष्टीला. त्या वेळीं गंगानदीच्या तीरावर बहुसुवर्णक नांवाचा एक प्रांत होता. राजानें तो एका विद्वान् ब्राह्मणाला दान दिला होता. त्या ब्राह्मणाचें नांव होतें गोविंद-दत्त व त्याच्या पत्नीचें नांव होतें अग्निदत्ता. गोविंददत्त व अग्निदत्ता हें एक आदर्श जोडपें होतें. दोघांचा संसार अगदीं सुखांत चालला होता. तीं दोघेंहि आल्या-गेल्या अतिथींना उदारपणें आश्रय देत. इतक्या सुखी संसारांत एकच गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिलेली असे. ती म्हणजे त्यांचीं मुलें. त्यांना पांच मुलगे होते. एकापेक्षां एक सुंदर व देखणे. त्या पांचीहि मुलांनीं घर कसें नेहमीं गजबजलेलें असे. वर वर पाहणाऱ्या कोणालाहि या जोडप्याच्या सुखी संसाराचा हेवा वाटावा; पण मुलांच्या काळजीनें त्या पतिपत्नींचें मन अगदीं पोखरून टाकलें होतें. कारण तीं सर्वच मुलें वेडपट होतीं. त्यांना काडीचीहि अक्कल नव्हती. प्रत्येक जण आपल्याच तोऱ्यांत असे. कोणत्या वेळीं कसें वागावें हें त्यांना कळतच नसे. आईवडिलांनीं त्यांना वळण लावण्याचा खूप प्रयत्न केला; पण पालथ्या घागरीवर पाणी ! शेवटीं नशिबावर हवाला ठेवून त्यांनीं आपल्या मुलांना सुधारण्याचा नाद सोडला.

• • •

## एका अतिथीचें आगमन

एकदा वैश्वानर नांवाचा एक अग्नीसारखा तेजस्वी ब्राह्मण त्यांच्या घरीं आला. गोविंददत्ताला बाहेर जाऊन बराच वेळ झाला होता. अग्निदत्ता स्वयंपाकघरांत आपल्या कामांत गढून गेली होती. पांचहि मुलें

ओठ् नर हंसत बागडत खेळत होतीं. त्यांच्याकडे पाहिल्यावर तीं वेडसर असतील अशी कुणाला कल्पनाहि येणें शक्य नव्हतें. त्या गुटगुटीत व सुंदर मुलांना पाहून वैश्वानराला समाधान वाटल. त्यांच्यापैकीं सर्वांत वडील मुलाजवळ तो गेला व त्याच्या पाठीवरून कौतुकानें हात फिरवीत त्यानें विचारलें, "बाळ ! तुझे वडील आहेत का रे घरीं?" तेव्हां देवदत्त विचित्रपणें त्याच्याकडे बघूं लागला. इकडे सोमदत्तानें त्याच्या हातांतील गांठोडें हिसकावून रस्त्यावर फेंकून दिलें. तें पाहून इतर भावंडें फिदीफिदी हंसूं लागलीं. असें विपरीत स्वागत झाल्यानें वैश्वानर संतापला. आई-बापांच्या शिकवणीनेंच मुलें याप्रमाणें वागतात अशी त्यानें कल्पना करून घेतली व "यापुढें या घरची पायरी चढणार नाहीं" अशी प्रतिज्ञा करून रागानें ताडताड पाय आपटीत तो घराबाहेर पडला.

● ● ●

## गोविंददत्ताची क्षमायाचना

गोविंददत्त काम उरकून येऊन घराच्या आवारांत शिरला, तोंच एक ब्राह्मण ताडानें शिव्याशाप पुटपुटत रागानें घरांतून बाहेर पडत असतांना त्याला दिसला. आपल्या मूर्ख मुलांनीं कांहीं तरी प्रताप गाजवला असणार ह त्यानें ताडलें. तो वैश्वानराजवळ आला व नमस्कार करून त्यानें त्याला घरीं येण्याची विनंती केली. घडलेली हकीकत सांगून "तुझ्या घरची पायरी मी आतां चढणार नाह।" अस वैश्वानर म्हणाला. तेव्हां गोविंददत्ताला फार वाईट वाटलें. आतांपर्यंत त्याच्याकडे आलेला अतिथि कधींहि विन्मुख परतला नव्हता. वैश्वानराचे पाय धरून तो म्हणाला, "महाराज ! माझे मुलगे मूर्ख आहेत. त्यांच्या या मूर्खपणाच्या वागणुकीकडे आपण लक्ष देऊं नका. त्यांना क्षमा करा व माझ्या घरीं चला." वैश्वानराच मन अपमानानें जळत होतें. गोविंददत्ताचें म्हणणें ऐकण्याच्या मनःस्थितींत तो नव्हता. तो रागानेंच गोविंददत्ताला म्हणाला, "मूर्खांची

संगत करणारा महामूर्ख असतो. म्हणून तुझ्या पातक्याच्या घरचें अन्न खाल्लें तर मला प्रायश्चित घ्यायची पाळी येईल. तेव्हां तुमच्या सावलीलाहि उभें राहण्याची माझी इच्छा नाहीं. जाऊं दे मला." असें म्हणून तो निघालासुद्धां; पण गोविंददत्तानें पुनः त्याचे पाय धरले. मन दगडाप्रमाणें कठीण करून तो निश्चयानें वैश्वानराला म्हणाला, "महाराज, आजपर्यंत जिवापलीकडे जपलेल्या या मूर्ख मुलांचा संबंध मी कायमचा तोडण्यास तयार आहें; पण 'अतिथि माझ्या घरून विमुख गेला' ही अपकीर्ति नको. शपथ घेऊन सांगतों कीं, त्या मूर्खांचें मी आजपासून तोंडहि पाहणार नाहीं." पण तेवढ्यानें वैश्वानराचें समाधान कुठलें व्हायला? शेवटीं अग्निदत्तेनेंहि येऊन तशीच शपथ घेतल्यावर त्याचा राग कांहींसा शांत झाला व त्यानें दोघांचें आतिथ्य स्वीकारायचें कबूल केलें.

● ● ●

## देवदत्त व सोमदत्त यांचा पश्चात्ताप

वडिलांचा व आलेल्या ब्राह्मणाचा संवाद मुलें ऐकत होतींच. शपथ घेतल्याप्रमाणें गोविंददत्त व अग्निदत्ता यांनीं पोटच्या पोरांशीं अबोला धरला व ते त्यांना सोडून जाण्याच्या तयारीला लागले. देवदत्त व सोमदत्त या दोन मुलांना या गोष्टीची कल्पना आली. आपल्या मूर्ख-पणामुळें आपणां सर्वांवर हा प्रसंग आला आहे अशी त्यांची खात्री झाली. आई-वडील सर्वांना सोडून जाणार म्हणून त्यांचा जीव खालींवर होऊं लागला. आपणच आपल्या मूर्खपणाचें प्रायश्चित्त घ्यावयाचें असें त्यांनीं मनाशीं ठरविलें व ते दोघेहि पश्चात्ताप पावून तपश्चर्येनें शंकरास प्रसन्न करून घेण्यासाठीं हिमालयांत निघून गेले. देवदत्तानें अन्नपाणी सोडलें. स्वतःला झाडाला उलटें टांगून घेतलें व खालीं पेटविलेल्या अग्निकुंडांतून येणाऱ्या धुराचे लोट नाकातोंडावाटे प्राशन करीत तो उग्र तपश्चर्या करूं लागला. शंकर त्याच्या तपश्चर्येनें प्रसन्न झाले व "माझा पुष्पदंत नांवाचा

गण होशील," असा वर त्यांनीं त्याला दिला. सोमदत्तहि अशाच तऱ्हेची खडतर तपश्चर्या करीत होता. रोज ताज्या, सुवासिक, फुलांनीं शंकराची पूजा करण्याचें व्रत त्यानें घेतलें. पण बर्फाच्छादित हिमशिखरावर फुलें कोठून येणार ? त्यासाठीं तो जिवाची पर्वा न करतां, रोज दऱ्या-खोऱ्यांत वणवण हिंडत असे व फुलें गोळा करीत असे. शेवटीं शंकर त्याच्यावरहि प्रसन्न झाले व "माल्यांनीं तूं माझी रोज पूजा करतोस, तेव्हां माल्यवान् नांवाचा तूं माझा गण होशील" असा वर त्यांनीं त्याला दिला. अशा रीतीनें देवदत्त व सोमदत्त हे शंकराचे प्रिय गण बनून कैलासावर राहूं लागले.

● ● ●

### पार्वतीचा शाप

एकदां शंकर पार्वतीला एकान्तांत विद्याधरांची अद्‌भुत गोष्ट सांगत होते. कोणालाहि कैलासावर सोडूं नको, असें पार्वतीनें नंदीला बजावून सांगितलें होतें. पण पुष्पदंतानें अदृश्य होऊन तेथें प्रवेश मिळविला व ती सर्व गोष्ट ऐकली. पुढें पार्वतीला तें समजलें, तेव्हां 'तूं मृत्यु-लोकांत जन्माला येशील' असा शाप तिनें त्याला दिला. माल्यवान् पुष्पदन्ता-बद्दल तिच्याकडे रदबदली करूं लागला, तेव्हां तिनें त्यालाहि तोच शाप दिला. शेवटीं दोघांनीं फारच विनवण्या केल्या त्या वेळीं पार्वतीचा राग थोडा शांत झाला व ती म्हणाली, "माझे शब्द केव्हांहि खोटे ठरणार नाहींत. पुष्पदंत पाटलीपुत्र नगरींत वररुचि या नांवानें जन्मास येईल व माल्यवान् प्रतिष्ठान शहरीं गुणाढ्य या नांवानें जन्म घेईल. वररुचीनें विंध्यारण्यांत काणभूति नांवाच्या पिशाचाला ही कथा सांगितली कीं, तो शापांतून मुक्त होईल व काणभूतीनें तीच कथा गुणाढ्याला सांगितली व गुणाढ्यानें ती लोकप्रिय बनविली म्हणजे तोहि शापमुक्त होईल." असें म्हणून पार्वती एकाएकीं अदृश्य झाली व पुष्पदंत आणि माल्यवान् आपल्या

मृत्युलोकांतील जन्माबद्दल विचार करीत जड अंतःकरणानें आपापल्या निवासाला निघून गेले.

● ● ●

**गुणाढ्याचा जन्म**

त्या सुमारास भरतखंडांत प्रतिष्ठान नांवाच्या राजधानींत श्रुतार्था नांवाची एक ब्राह्मणकन्या रहात होती. माल्यवानानें तिच्या पोटीं जन्म घेतला व तोच पुढें गुणाढ्य या नांवानें प्रसिद्धीस आला.

श्रुतार्था ही सोमशर्मा नांवाच्या एका ब्राह्मणाची मुलगी. तिला वत्स व गुल्म या नांवाचे दोन वडील भाऊ होते. या भावंडांच्या दुर्दैवानें त्यांच्या बालपणींच त्यांचे आईवडील त्यांना सोडून गेले. बिचारीं भावंडें अनाथ व पोरकीं झालीं. बालवयांतच वत्स व गुल्म यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांनीं आपल्या धाकट्या बहिणीला प्राणापलीकडे जपलें. तिचेंहि आपल्या भावांवर नितान्त प्रेम होतें. खेळी-मेळीनें त्यांचे दिवस मजेंत चालले.

श्रुतार्था आतां उपवर झाली होती. तिच्या भावांना तिच्या लग्नाची काळजी वाटूं लागली. श्रुतार्था जन्मतःच सुंदर व देखणी मुलगी होती. तारुण्यानें तिचें मूळचें सौंदर्य अधिकच खुलून दिसूं लागलें. एकदां ती स्नानासाठीं नदीवर गेली होती. त्या वेळीं नागराज वासुकीचा पुतण्या कीर्तिसेन कांहीं निमित्तानें तेथें आला. त्याच्या दृष्टीला ती पडली व तिच्या सौंदर्यानें तो मोहून गेला. त्याच्या चेहऱ्यावरील मुग्ध भाव पाहून तिचेंहि मन त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. त्यानें आपण होऊन तिला आपली ओळख करून दिली व गांधर्वविधीनें तिच्याशीं विवाह करण्याची आपली इच्छा त्यानें बोलून दाखविली. त्याच्या बोलण्याचालण्यावरून व एकंदर वागणुकीवरून श्रुतार्थेला त्याच्या उच्च घराण्याची कल्पना आली व ' तो आपल्याला अनुरूप पति आहे ' असें वाटून तिनें त्याची

विनंति मान्य केली. गांधर्वविधीनें त्यांचा विवाह झाला. नंतर दोघांचा परिचय वाढत गेला. पण हें गुपित तिनें कोणाजवळहि उघड केलें नाहीं. पुढें जेव्हां एक बालक तिच्या पोटीं जन्माला येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां मात्र तिला आपलें गुपित फार काळ लपवून ठेवणें शक्य नव्हतें. तिच्या भावांना शंका येऊं लागली. शेवटीं सर्व हकीकत त्यांना सांगणें तिला भाग पडलें. पण तिच्या सांगण्यावर त्यांचा विश्वास बसेना. त्या वेळीं त्यांची समजूत कशी घालावी हेंच तिला कळेना. शेवटीं तिनें कीर्तिसेनाचें स्मरण केलें. तेव्हां तो तेथें प्रत्यक्ष आला व तिच्या भावांना म्हणाला, " तुम्ही आपल्या बहिणीबद्दल भलती सलती शंका घेऊं नका. तुमची ही बहीण पूर्वजन्मीं एक श्रेष्ठ अप्सरा होती व तुम्हीहि पूर्वजन्मीं दोन गंधर्व होतां. शापामुळें तुम्हां सर्वांना या जन्मीं मृत्युलोकांत यावें लागलें. मीं तुमच्या बहिणीशीं गांधर्वविधीनें विवाह केला आहे. हिला पुत्र झाला कीं तुम्ही सर्वजण शापांतून मुक्त व्हाल. माझी माहिती हिनें तुम्हांला दिलीच आहे." असें म्हणून कीर्तिसेन एकाएकीं अन्तर्धान पावला. कीर्तिसेनाचें तें भाषण ऐकून दोन्ही भावांच्या मनांतील शंका दूर झाली व ते आपल्या बहिणीची अधिक प्रेमानें काळजी वाहूं लागले.

कांहीं काल लोटल्यावर श्रुतार्था एका शुभदिवशीं प्रसूत झाली. मुलगा झालेला पाहून तिच्या भावांचा आनंद गगनांत मावेना. त्या गुटगुटीत व तेजस्वी बालकाचें मुख पाहून तिला आपल्या आई-वडिलांची आठवण झाली व तिचे डोळे पाणावले. पण वत्स व गुल्म यांनीं तिला कोणत्याहि बाबतींत उणीव भासूं दिली नाहीं. मोठ्या समारंभानें त्यांनीं आपल्या भाच्याचें बारसें केलें. त्यांनीं त्याचें नांव गुणाढ्य असें ठेवलें. गुणाढ्यहि आपल्या बाललीलांनीं सर्वांचीं मनें रिझवीत होता.

अशा रीतीनें गुणाढ्याचें बालपण चाललें होतें. निर्दय काळाला तें सुख पाहवलें नाहीं. त्यानें श्रुतार्थेवर अचानक झडप घातली व त्या

अजाण बालकावरील मायेची सावली नष्ट झाली. त्याच्या दोन्ही मामांनीं शोक आवरून त्याचें संगोपन करण्यास सुरुवात केली. पण गुणाढ्याच्या नशिवीं तेंहि सुख फार काळ नव्हतें. निष्ठुर काळानें त्या दोघांनाहि हिरावून नेलें व आतां गुणाढ्य पूर्णपणें अनाथ व पोरका बनला.

• • •

## गुणाढ्याचें शिक्षण

वय लहान, त्यांतून जवळ मायेचें माणूस एकहि नाहीं; काय करावें हेंच त्याला कळेना. पण परिस्थिति माणसाला शहाणा बनविते. त्यानें आपला शोक आवरला. अगदीं लहानपणापासूनच त्याला विद्येची आवड होती. पूर्वजन्मींचे संस्कार त्याच्या बालमनाला मार्गदर्शन करीत होते. खूप विद्या मिळवायची व मोठा पंडित व्हायचें ही महत्त्वाकांक्षा त्यानें आपल्या उराशीं बाळगली. त्यासाठीं घरदार सोडून तो दक्षिणेंत गेला. एका विद्वान् आचार्याच्या पायाजवळ बसून त्यानें व्याकरण-शास्त्राचें अध्ययन केलें. अनेक विद्यालयांत तो राहिला व विविध शास्त्रांत पारंगत झाला. त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. त्यासाठीं गुरूंच्या शोधांत त्याला रानावनांतून वणवण भटकावें लागलें; कितीतरी उपवास काढावे लागले; गुरुशुश्रूषेचे कष्ट घ्यावे लागले; पण या तपश्चर्येचें फळ त्याला मिळालें. तो एक प्रतिभासंपन्न महापंडित समजला जाऊं लागला. त्याची कीर्ति ऐकून अनेक विद्यार्थी त्याच्याकडे शास्त्रांचें अध्ययन करण्यासाठीं येऊं लागले. आतां त्याचा काळ विद्यादानांत जाऊं लागला. त्याच्या हाताखालीं अनेक विद्यार्थी तयार होऊं लागले. अशा रीतीनें त्याची कीर्ति सर्व दिशांना पसरूं लागली.

• • •

## गुणाढ्याचें राजधानींत आगमन

गुणाढ्य बरींच वर्षें दक्षिणेंतच राहिला होता. त्याला आपल्या घरीं यावें असें वाटूं लागलें. कांहीं शिष्यांना बरोबर घेऊन तो

'प्रतिष्ठान' राजधानींत आला. त्या अवधींत राजधानीचें स्वरूप बरेंच पालटलें होतें. सर्व प्रकारच्या लोकांनीं नगरी गजबजून गेली होती. तो नगरींत आला त्या वेळीं कांहीं ठिकाणीं ब्राह्मण मोठमोठ्यानें सामवेद गात होते; तर कांहीं ठिकाणीं जुगारी लोक द्यूताची महती गाण्यांत दंग झाले होते. कांहीं ठिकाणीं व्यापारी आपल्या बुद्धिवैभवाची प्रौढी मिरवीत होते, तर दुसरीकडे कांहीं वात्रट लोक भोळ्याभाबड्यांची चेष्टा करीत होते. पावलोपावलीं अशा अनेक गोष्टी पहात व ऐकत गुणाढ्य राजधानींतून चालला होता.

गुणाढ्य घरच्या ओढीनें आला खरा. पण त्याचें घरदार केव्हांच नाहींसें झालें होतें. घरचें माणूस म्हणून त्याला कोणीच उरलें नव्हतें. बालपणींच्या गोष्टी आठवीत तो चालला होता. शेवटीं शिष्यांसह तो राजवाड्यांत आला. त्या वेळीं सातवाहन राजा राज्य करीत होता. राजाला विद्येचा गंधहि नव्हता. त्यामुळें कांहीं कांहीं वेळां त्याला मनांतून फार वाईट वाटत असे. राजनिष्ठ प्रधानांमुळें राज्यकारभार सुरळीत चालला होता. आपल्या बुद्धीची कुवत माहीत असल्यामुळें सातवाहनाची भिस्त विशेषतः शर्ववर्मा नांवाच्या प्रधानावर होती.

• • •

## गुणाढ्याला मंत्रिपद

राजा दरबारांत रत्नजडित सिंहासनावर बसला होता. दोन्ही बाजूला मंत्री आपापल्या आसनांवर आरूढ झाले होते. इतर सरदारहि बहुसंख्येनें दरबारांत उपस्थित होते. त्या वेळीं गुणाढ्य आपल्या निवडक शिष्यांसह तेथें आला. गुणाढ्याची कीर्ति यापूर्वींच सर्वांच्या कानीं आली होती. शर्ववर्म्यानें राजाला त्याची ओळख करून दिली. सर्वविद्यासंपन्न अशा गुणाढ्याचा राजानें मोठ्या गौरवानें सत्कार केला व त्याच्या विद्वत्तेवर खूष होऊन राजानें त्याला मंत्रिपदहि दिलें. 'आपल्याला मंत्रिपद

मिळेल ' ही कल्पना गुणाढ्याच्या स्वप्नांतसुद्धां आली नसती. पण पुरुषाचें भाग्य अनेकदां अशाच रीतीनें अकल्पितपणें उदयाला येतें. गुणाढ्यानें नंतर अनुरूप अशा मुलीशीं विवाह केला व राजाचें मंत्रिपद सांभाळीत तो आनंदानें आपल्या संसारांत गढून गेला. तो आतां मंत्री झाला असला तरी आपल्या शिष्यांना विद्या देण्याचें त्याचें व्रत तसेंच चालू होतें. त्यांतच त्याला मनापासून आनंद मिळत होता.

• • •

## देवीकृति उद्यान

एकदा तो एकटाच फिरत फिरत गोदावरीच्या कांठीं आला. त्याला तेथें एक नवीनच उद्यान दिसलें. त्याच्या लहानपणीं तें उद्यान नव्हतें. त्यानें सहज माळ्याकडे चौकशी केली. तेव्हां माळी म्हणाला, " महाराज ! 'देवीकृति' नांवाचें हें उद्यान अलीकडेच एका ब्राह्मणानें तयार केलेलें आहे. तो ब्राह्मण पूर्वी नर्मदेच्या तीरावर रहात होता. तो अत्यंत आळशी व दरिद्री होता. कोणीहि त्याला भिक्षा घालीत नसे. त्यामुळें चिडून व निराश होऊन तो विंध्यारण्यांत गेला. जिवाला कंटाळून विंध्यवासिनी देवीच्या चरणावर आपलें मस्तक अर्पण करण्याचा त्यानें निश्चय केला. शिरच्छेद करण्यासाठीं त्यानें हातांत शस्त्र घेतलें. तेव्हां प्रसन्न होऊन देवीनें त्याच्यावर कृपा केली. त्या वेळेपासून त्याची तहानभूक कायमची नष्ट झाली. अशा रीतीनें तो देवीची उपासना करीत होता. एकदा देवीनें त्याला एक बीं दिलें व हें सुंदर उद्यान निर्माण करण्याची आज्ञा केली. ब्राह्मणानें येथें येऊन हें दिव्य उद्यान तयार केलें व " आतां याचें रक्षण तुम्ही करा " असें सांगून तो गुप्त झाला. अशा रीतीनें हें अपूर्व उद्यान निर्माण झाल्यामुळें याचें नांव 'देवीकृति' असें पडलें." माळ्यानें सांगितलेली ही गोष्ट ऐकून गुणाढ्य आश्चर्यचकित झाला व उद्यानाच्या सौंदर्याची तारीफ करीत तो घरीं परतला. या उद्यानानें त्याला

इतकें मोहून टाकलें होतें कीं, पुढें सवड मिळाली म्हणजे तो या उद्यानांत येऊन तेथील निसर्गसौंदर्यांत तासन् तास रममाण होऊन जात असे.

• • •

## राजाचा मूर्खपणा

एकदा वसंतोत्सव चालू होता. राजाला जलक्रीडा करण्याची लहर आली. आपल्या परिवारासह तो 'देवीकृति' उद्यानांत आला. तेथें एक विस्तीर्ण व रम्य असा सुंदर तलाव बांधलेला होता. राजानें त्या तलावांत खूप वेळ जलक्रीडा केली. राजाची एक राणी फारच नाजुक होती. राजानें केलेला पाण्याचा मारा तिला सहन होईना. तिनें विनवणीच्या स्वरांत राजाला प्रार्थना केली – "मोदकैः परिताडय माम् ।" तिचा आशय राजाला कळला नाहीं. त्या निर्बुद्ध राजानें आपली बुद्धि लढविली! त्याला वाटलें, 'जलक्रीडेनें ही राणी दमून गेली आहे. तेव्हां हिला सपाटून भूक लागली असावी. म्हणूनच ही मोदकांची मागणी करीत आहे.' त्यानें लागलीच मोदकांचे हारे भरून आणण्याची आज्ञा सोडली. राजाचीच आज्ञा ती! तिच्याबद्दल शंका कोण घेणार? सेवकांनीं मोदकांचे हारे तात्रडतोब भरून आणले. जलक्रीडा चालू असतांनाच तो राणीवर मोदकांचा वर्षाव करूं लागला. कुणालाच राजाच्या या कृतीचा उलगडा होईना. सगळेजण त्याच्याकडे टकमक पाहूं लागले. खुशींत येऊन राजा मोदकांचा वर्षाव करीतच होता. शेवटीं राणी उपहासानें म्हणाली, "महाराज! जलक्रीडेच्या वेळीं मोदकांचा काय संबंध आहे? "मा उदकैः परिताडय माम्" म्हणजे "माझ्यावर पाण्याचा मारा करूं नका" असें मीं म्हणालें होतें. त्यांत मा आणि उदकैः या दोन शब्दांचा साधा संधीहि तुम्हांला कळूं नये ना? इतके कसे हो तुम्ही मूर्ख?" राणीचें हें भाषण ऐकून आसपासच्या सेवकांना कांहीं केल्या आपलें हंसूं आवरेना. सर्वांसमक्ष आपलें हंसूं झालें हें पाहून राजा मनांतल्या मनांत

फार खजील झाला. त्यानें लागलीच जलक्रीडा थांबविली व अत्यंत खिन्न मनानें तो आपल्या महालांत परतला.

● ● ●

## अपमानाबद्दल खंत

सर्व परिवारादेखत झालेला अपमान राजाच्या मनाला फारच लागून राहिला. तो आपल्या महालांत आला व पलंगावर त्यानें आपलें शरीर धाडकन लोटून दिलें. जेवण नाहीं, खाण नाहीं, कोणाशीं चकार शब्दहि बोलणें नाहीं. त्याच्या मनांत एकच विचार थैमान घालीत होता. शेवटीं त्यानें निश्चय केला, " शास्त्राचें अध्ययन करून विद्या तरी शिकायच्या, नाहीं तर मरणाला तरी तयार व्हायचें." मनाचा हा निश्चय झाल्यानंतर त्याला थोडें समाधान लाभलें. पण कोणालाहि भेटण्याची त्याची इच्छा नव्हती. राजाच्या या अस्वस्थतेचें कारण इतर सेवकांच्या लक्षांत मुळींच आलें नव्हतें. जलक्रीडेकरितां गेलेल्यांनाच त्याची थोडीफार कल्पना होती. 'राजाची मनःस्थिति चिंताजनक झालेली आहे' ही बातमी हां हां म्हणतां सगळीकडे पसरली. राजाची चौकशी करण्यास लोकांची रीघ लागली. पण राजापर्यंत कोणाला प्रवेश मिळणेंच अशक्य होतें. अशा वेळीं शर्ववर्मा व गुणाढ्य हे मंत्रीहि राजाची विचारपूस करण्यासाठीं राजवाड्यांत आले. त्यांनीं सेवकाकडे चौकशी केली. तेव्हां तो म्हणाला, " महाराज पांडित्याचा खोटा गर्व वाहणाऱ्या राणीसाहेबांनीं म्हणे राजेसाहेबांचा सर्वांदेखत पाणउतारा केला. त्यामुळें राजेसाहेब अत्यंत अस्वस्थ झाले आहेत व दार बंद करून महालांत बसले आहेत." सेवकाचे हे शब्द ऐकून दोघांना कशाचाहि उलगडा होईना. बराच वेळ विचार केल्यावर चाणाक्ष शर्ववर्म्यानें राजाच्या खिन्नतेचें कारण ताडलें. राजाला आपल्या अडाणीपणाची नेहमीं टोंचणी लागून राहिलेली असते, याची त्याला कल्पना होतीच. राजाच्या

मूर्खपणामुळेंच त्याचा पाणउतारा होण्याचा प्रसंग आला असेल, असा त्यानें तर्क केला. अशा स्थितींत राजाला स्वस्थ एकटा पडूं द्यावें व दुसऱ्या दिवशीं त्याची भेट घ्यावी असें दोघांनीं ठरविलें व ते आपापल्या घरीं निघून गेले.

• • •

## शर्ववर्म्याचें आश्वासन

ठरल्याप्रमाणें ते दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजाच्या भेटीला आले. त्यांनीं राजाच्या महालांत कसाबसा प्रवेश मिळविला. राजा त्यांच्याशीं एक शब्दहि बोलला नाहीं. गुणाढ्य नम्रतेनें राजाजवळ जाऊन बसला. शर्ववर्माहि त्याच्या शेजारींच बसला. गुणाढ्यानें विचारलें, "महाराज ! आपण असे खिन्न कां ?" राजानें त्याच्याकडे वळूनहि पाहिलें नाहीं. तो आपली शून्य दृष्टि आढ्याकडे लावून तसाच पडून राहिला. शर्ववर्म्याला राजाच्या मनाची व्यथा माहीत होती. राजाला कसें बोलकें करावें हें त्यानें पूर्वींच ठरविलें होतें. तो म्हणाला, "महाराज ! आज पहांटे मला एक स्वप्न पडलें. त्यांत एक कमळ आकाशांतून खालीं पडतांना मला दिसलें. त्याच वेळीं कोणी तरी दिव्य व्यक्ति आकाशांतून खालीं उतरली व तिनें तें कमळ हातांत घेऊन विकसित केलें. तेव्हां त्यांतून शुभ्र वस्त्रें परिधान केलेली एक देवता बाहेर आली व तिनें आपल्या मुखांत एकदम प्रवेश केला. हें स्वप्न पाहून मी जागा झालों. महाराज या स्वप्नावरून माझी तर खात्रीच झाली आहे कीं, प्रत्यक्ष सरस्वतीदेवीच आपल्या मुखांत प्रवेश करणार." "काय ? मला विद्या येणार ?" राजानें अधीरतेनें विचारलें व गुणाढ्याकडे वळून त्यानें प्रश्न केला, "पंडितराज ! व्याकरणशास्त्र शिकायला किती वर्षें लागतील ?" त्यावर गुणाढ्य म्हणाला, "महाराज ! व्याकरण हें सर्व विद्यांचें मुख आहे. सामान्य लोकांना तें शिकण्यास

कमींत कमी बारा वर्षे तरी लागतात. पण मीं तें आपणांस सहा वर्षांत शिकवीन."

विद्येचा प्रश्न आला कीं, राजा गुणाढ्याकडेच चौकशी करतो या गोष्टीबद्दल शर्ववर्म्याला थोडासा मत्सर वाटूं लागला. तो कांहींशा ईर्षेनें म्हणाला, "पंडितराज! सुखांत वाढलेल्यांना इतकीं वर्षे शिकण्याचे कष्ट कसे सहन होतील?" व राजाकडे वळून तो म्हणाला, "महाराज! मी आपणाला सहा महिन्यांत सर्व व्याकरणशास्त्र शिकवीन."

● ● ●

## गुणाढ्याची प्रतिज्ञा

केवळ आपल्यावर मात करण्यासाठीं शर्ववर्म्यानें राजाला तसं आश्वासन दिलें, याची गुणाढ्याला खात्री होती. त्यामुळें त्याला राग आला व त्यानें शर्ववर्म्याचें आव्हान स्वीकारलें. तो चढ्या आवाजांत म्हणाला, "शर्ववर्मन्! तूं भलती पैज मारूं नकोस. व्याकरणशास्त्र म्हणजे काय चेष्टा आहे? तूं जर सहा महिन्यांत महाराजांना व्याकरणशास्त्र शिकविलेंस तर मी संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही प्रचलित भाषांचा त्याग करीन."

शर्ववर्माहि आता इरेला पेटला होता. शक्याशक्यतेचा विचारहि त्याच्या मनांत डोकावला नाहीं. तो प्रतिज्ञापूर्वक म्हणाला, "जर मी सहा महिन्यांत महाराजांना व्याकरणशास्त्र शिकविलें नाहीं तर मी बारा वर्षे तुझ्या पादुका डोक्यावरून वाहून नेईन." ईर्षेच्या भरांत तो ही प्रतिज्ञा करून चुकला खरा! पण नंतर त्याला आपल्या कृतीचा पश्चात्ताप होऊं लागला. बारा वर्षांत ज्या शास्त्राचा अभ्यास पूर्ण होत नाहीं, तें शास्त्र या मूर्ख राजाला सहा महिन्यांत कसें शिकवायचें हा प्रश्न त्याला पडला. तो घरीं आला तो या काळजींतच. त्याच्या पत्नीनें त्याच्या

काळजीचें कारण विचारलें. त्यानें घडलेली हकीकत तिला सांगितली. तेव्हां ती म्हणाली, "महाराज! ही प्रतिज्ञा पार पाडायला मानवी प्रयत्न अपुरे आहेत. आपण कार्तिकेयालाच शरण जा. तोच आपल्याला मार्गदर्शन करील." शर्ववर्म्याला ही गोष्ट पटली व जेवणखाण न करतां कार्तिकेयाच्या दर्शनासाठीं तो अरण्याकडे निघाला.

● ● ●

## शर्ववर्म्याची तपश्चर्या

कार्तिकेयाची कृपा होईपर्यंत त्यानें जेवणखाण सोडून दिलें. मौन-व्रत स्वीकारून तो पायींच प्रवासास निघाला. त्याला बरेंच दूरचें अंतर चालून जायचें होतें. वाटेंत त्याला सपाटून भूक लागली. पण कांहीं खायचें नाहीं असा निश्चय केलेला! शेवटीं त्याला ग्लानी आली व तो बेशुद्ध होऊन पडला. प्रवासांत कोणीहि सोबती नव्हता. त्याला शुद्धीवर कोण आणणार? मंद व शीतल वाऱ्याच्या झुळुकांनीं तो कांहीं वेळानें शुद्धीवर आला. त्या वेळीं दणकट शरिराचा एक महापुरुष तेथें आला व त्याला उठवून म्हणाला, "वत्सा! तुझा निश्चय दृढ आहे. तुझी कार्य-सिद्धि होईल. यापुढें तुला भुकेची बाधा होणार नाहीं." असें म्हणून तो अदृश्य झाला. त्या पुरुषाच्या स्पर्शानें शर्ववर्मा ताजातवाना झाला. नव्या दमानें राहिलेला मार्ग तो चालून गेला व त्यानें कार्तिकेयाचें मंदिर गांठलें. धांवतच तो देवळांत गेला. कार्तिकेयापुढें त्यानें लोटांगण घातलें व त्याच्या धीरगंभीर प्रसन्न मूर्तीकडे तो कितीतरी वेळ पहात राहिला. देवालयांत राहूनच त्यानें रोज कार्तिकेयाची उपासना सुरू केली. एके दिवशीं त्याच्या तपश्चर्येला फळ आलें.

● ● ●

## कार्तिकेयाचा अनुग्रह

एके दिवशीं सकाळीं स्नानसंध्या करून तो ध्यान लावून

बसला. थोड्या वेळानें कार्तिकेयानें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें. सरस्वतीदेवी आपल्या मुखांत प्रवेश करीत असल्याचा भास शर्ववर्म्याला झाला. कार्तिकेयानेंहि आपल्या गंभीर स्वरानें ' सिद्धो वर्णसमाम्नायः ' हें सूत्र उच्चारलें. शर्ववर्म्यानें थोड्या धिटाईनें त्या सूत्राचा पुढील भाग पुरा केला. पण कार्तिकेयाला ती गोष्ट तितकीशी आवडली नाहीं. " तूं मध्येंच बोललास. नाहींतर हें शास्त्र पाणिनीच्या व्याकरणालाहि मागें टाकणारें ठरलें असतें. असो. या व्याकरणाचीं तंत्रें म्हणजे प्रकरणें संख्येनें कमी असल्यामुळें याला 'कातंत्र' असें नांव पडेल किंवा माझ्या वाहनाच्या नांवावरून 'कालापक' या नांवानेंहि तें प्रसिद्धीस येईल. " असें म्हणून कार्तिकेयानें त्या छोट्या कातंत्र व्याकरणाचें ज्ञान शर्ववर्म्याला दिलें तो शेवटीं म्हणाला, " भक्ता ! तुमचा राजा सातवाहन हा पूर्वजन्मीं भारद्वाज ऋषींचा शिष्य होता. पण मुनींच्या शापामुळें तो या जन्मीं मूर्ख राजाच्या जन्माला आला. माझ्या कृपेनें त्याचे पूर्वजन्मींचे संस्कार आतां जागृत होतील व त्यामुळें सहा महिन्यांच्या आंत तो व्याकरणशास्त्रांत पारंगत होईल. " असें सांगून कार्तिकेयानें शर्ववर्म्याला निरोप दिला. तेथून तो घरीं येण्यासाठीं निघाला. पुजाऱ्यांनीं त्याला वाटेंत उपयोगी पडावेत म्हणून कांहीं तांदूळ दिले. त्यांचा त्यानें अनेकदां उपयोग केला. वाटेंत ते संपविण्याचाहि त्याने प्रयत्न केला. पण आश्चर्य हें कीं ते पूर्वी होते तितकेच राहिले. दैवी कृपेच कौतुक करीत तो सातवाहनाकडे आला.

राजाला त्यानें परमेश्वरी कृपेची सर्व हकिगत सांगितली. राजा दररोज त्याच्याकडून पाठ घेऊं लागला. सहा महिन्यांच्या आंतच राजाला संपूर्ण व्याकरणशास्त्राचें ज्ञान प्राप्त झालें. त्या अवधींत गुणाढ्य प्रतिष्ठान शहरींच राजाचा मंत्री म्हणून काम पहात होता. एके दिवशीं एक कवि राजसभेंत आला. त्यानें आपलें काव्य राजसभेंत वाचून दाखविलें. सर्वसामान्य लोकांना तें सहजासहजीं समजूं शकलें नाहीं. तेव्हां

राजानें स्वतः त्या काव्याचा सोप्या संस्कृत भाषेंत अनुवाद केला व सभेंतील लोकांना तें काव्य समजावून सांगितलें. तें पाहून सभा आश्चर्यचकित झाली. राजाचें व्याकरणशास्त्राचें अध्ययन पूर्ण झालें. तेव्हां त्यानें गुरुदक्षिणा म्हणून रत्नांचे ढीग शर्ववर्म्याच्या चरणीं ओतले व नर्मदेच्या तीरावरील भरुकच्छ नांवाचा देश त्याला अर्पण केला.

• • •

## गुणाढ्याचा अरण्यवास

आपण पैजेंत हरलों याची गुणाढ्याला खात्री पटली. कबूल केल्याप्रमाणें गुणाढ्यानें संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही भाषांचा त्याग केला. अशा स्थितींत राजाचें मंत्रिपद सांभाळणें शक्य नव्हतें; म्हणून मुकेपणानेंच त्यानें राजाचा निरोप घेतला व तपश्चर्या करण्यासाठीं तो विंध्यारण्याकडे जावयास निघाला.

गुणाढ्यानें राजधानी सोडून जाऊं नये म्हणून राजानें त्याचें मन वळविण्याचा बराच प्रयत्न केला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही प्रचलित भाषांचा त्यानें त्याग केला असल्यामुळें, तो तोंड असून मुका बनला होता. त्यानें घरादाराचा त्याग केला व भटकत भटकत तो विंध्यारण्यांत येऊन पोहोंचला.

• • •

## पिशाचांचें दर्शन

ती वेळ रात्रीची होती. त्याला लांबून कसला तरी विचित्र आवाज ऐकूं आला. कुतूहलानें तो त्या बाजूस वळला व तें दृश्य पाहून तो जागच्या जागींच खिळून राहिला. त्याला तेथें पिशाचांचा मेळावा दिसला. तीं आपापसांत कांहींतरी बोलत होतीं. त्यांच्या भाषेंतील तुरळक शब्द प्राकृत भाषेला जवळचे होते. पण विशेषतः त्यांच्या हावभावावरूनच तो त्यांच्या बोलण्याचा आशय समजूं शकत होता. त्याच्या डोक्यांत एकदम

एक विचार चमकून गेला. पिशाच्चांची भाषा आपण शिकलो तर आपले व्यवहार बरेचसे सोपे होतील. पण पिशाचामध्यें वावरायचें कसें ? त्याला एकदम आठवलें कीं, धार्मिक व पवित्र माणसांवर पिशाच्चांचा प्रभाव पडूं शकत नाहीं. उलट एखादा विद्वान्, देवाचा भक्त असेल, तर तो आपला पगडा पिशाच्चांवर बसवूं शकतो. असा विचार करीत तो मंद मंद पावलें टाकीत. त्या पिशाच्चांच्या जवळ गेला. त्याला पाहून त्यांच्यांत बरीच गडबड उडाली. तीं मोठ्यानें चीत्कार करूं लागलीं. गुणाढ्य मुळींच घाबरला नाहीं. तो त्यांच्या अगदीं जवळ आला आणि आश्चर्य हें कीं, त्या पिशाच्चांच्या प्रमुखानें आपल्या अनुयायांना शांत केलें व तो गुणाढ्याचें स्वागत करण्यासाठीं हात जोडून सामोरा गेला. हा पिशाच्चांचा प्रमुख म्हणजे काणभूति होता. यालाच पुष्पदंतानें पूर्वीं विद्याधरांची अपूर्व कथा सांगितली होती. आतां ती कथा सांगून शापमुक्त होण्यासाठीं तो गुणाढ्याची वाट पहात विंध्यारण्यांत राहिला होता.

● ● ●

## विद्याधर-कथांचें श्रवण व बृहत्कथेचें लेखन

पिशाच्चांच्या सहवासानें गुणाढ्य थोड्याच दिवसांत पैशाची भाषेंत निष्णात झाला. तेव्हां काणभूतीनें पैशाची भाषेंत सात विद्याधरांच्या अद्‌भुत कथा त्याला सांगितल्या. त्या कथा इतक्या रम्य व अद्‌भुत होत्या कीं त्या कवि गुणाढ्याच्या मनांत सारख्या घोळूं लागल्या. त्यानें त्या कथा चिरंतन करण्याचें ठरविलें. त्यानें त्यासाठीं अरण्यांतील एक एकान्त स्थळ पाहिलें व तो तेथें गेला. कथा लिहून काढायच्या असा त्यानें निश्चय केला. पण त्या अरण्यांत लेखनाचें साहित्य कोठून मिळ-णार ! कांहीं पिशाच्चेंहि त्याचे शिष्य बनलीं होतीं. त्यांच्या साहाय्यानें त्यानें भूर्जपत्रें तयार केलीं. पण शाई कोठून मिळणार ? गुणाढ्यानें स्वतःच्या शरिरांतील रक्त काढून दररोज कांहीं श्लोक लिहिण्याचा क्रम

चालू ठवला. त्याचें काव्यलेखन म्हणजे एक प्रकारचें दिव्यच होतें. अशा रीतीनें सात वर्षें त्याच्या लेखनाची तपश्चर्या चालू होती. त्या अवधींत त्यानें सात विद्याधरांच्या कथांवर मोठें काव्य रचलें. त्याच्या काव्याची श्लोकसंख्या सात लाख होती. त्या वेळीं त्याचें काव्य सर्वांत मोठें असल्या-मुळें तें 'बृहत्कथा' या नांवानें प्रसिद्धीस आलें. त्या काव्यांत त्यानें आपले प्राण ओतले होते. विद्याधरांच्या त्या कथा होत्या. तेव्हां विद्या-धर तें काव्य पळवून नेतील या भीतीनें डोळ्यांत तेल घालून तो प्राणा-पलीकडे त्याचें जतन करीत होता. 'बृहत्कथा' लिहून पूर्ण झाल्यावर गुणाढ्यानें ती काणभूति पिशाचास दाखविली. ती वाचून काणभूति शाप-मुक्त झाला व पूर्वीप्रमाणें तो यक्ष बनला. ती कथा ऐकून इतर पिशाचेंहि दिव्य लोकाला गेलीं. इतका त्या कथेचा दिव्य प्रभाव होता !

गुणाढ्य मात्र केवळ कथा लिहून किंवा वाचून शापमुक्त होणार नव्हता. शापांतून मुक्त होण्यासाठीं ती कथा लोकांत रूढ करणें त्याला भाग होतें. ती लोकप्रिय कशी करावी हा त्याला मोठा प्रश्न पडला. राजा-श्रयाखेरीज ही गोष्ट शक्य नव्हती, हें त्याला कळून चुकलें. पण आतां तो आपण होऊन सातवाहन राजाकडे जायला तयार नव्हता. आपले गुरुजी अलीकडे नेहमीं सचिंत असतात ही गोष्ट गुणदेव व नंदिदेव यांच्या लक्षांत आली. त्या शिष्यांनीं त्याला आग्रहपूर्वक विचारलें, तेव्हां शेवटीं त्यानें आपल्या काळजीचें कारण त्यांना सांगितलें.

त्या शिष्यांनीं त्याची काळजी दूर केली. ते म्हणाले, "आचार्य ! सातवाहन राजा विद्येचा मोठा उपासक आहे. तो विद्वान् कवींना राजाश्रय देतो. त्याचा बराच काळ काव्यचर्चेंत जातो. तो या सर्वश्रेष्ठ महाकाव्याचा निश्चित स्वीकार करील. आपण परवानगी द्या म्हणजे आम्ही बृहत्कथेच्या पोथ्या त्याच्याकडे घेऊन जातों." त्या प्रिय शिष्यांचा आग्रह गुणाढ्याला मोडवेना. राजा बृहत्कथेचा स्वीकार करील कीं नाहीं याबद्दल त्याला

शंकाच होती. पण विशेष आढेवेढे न घेतां गुणाढ्य त्या गोष्टीस तयार झाला व त्या दोन शिष्यांसह तोहि 'प्रतिष्ठान' नगराकडे जावयाला निघाला.

• • •

## बृहत्कथा घेऊन राजधानींत आगमन

ते तिघेहि गप्पागोष्टी करीत चालले होते. अधून मधून गुणाढ्य त्यांना नव्या नव्या अद्भुत गोष्टी सांगत होता. त्यामुळें त्यांना प्रवासाचा शीण मुळींच जाणवला नाहीं. प्रतिष्ठान नगर अगदीं जवळ आलें. राजधानींतील गगनचुंबी राजवाड्याचीं व इतर मंदिरांचीं शिखरें लांबूनच दिसूं लागलीं. गुणाढ्य आपल्या आवडत्या शिष्यांसह नगराबाहेरील 'देवीकृति' उद्यानांत आला. तो स्वतः राजसभेंत जाण्यास तयार नव्हता. त्यानें आपल्या दोन्ही शिष्यांकडे बृहत्कथेची पोथी दिली. ते चौकशी करीत करीत रस्त्यांतून चालले. त्यांच्या कांहींशा विचित्र आकृति पाहून रस्त्यावरील लोकांना आश्चर्य वाटलें. ते त्यांच्याकडे विचित्र नजरेनें पाहून आपआपसांत कांहीं तरी कुजबुजूं लागले. पण लोकांच्या कुजबुजण्याकडे दुर्लक्ष करून ते थेट राजसभेकडे आले.

गुणाढ्याच्या सहवासानें त्यांना संस्कृत भाषा चांगलीच येत होती. त्यामुळें भाषेची अडचण त्यांना भासली नाहीं. आपण आल्याची वर्दी सातवाहनाकडे देण्याची कामगिरी त्यांनीं द्वारपालावर सोंपविली. 'परप्रांतीय दोन पंडित आले आहेत' असें द्वारपालानें राजाला कळविलें. त्यांना लागलीच सभेंत आणण्याची राजानें आज्ञा दिली. गुणदेव व नंदिदेव बृहत्कथेच्या पोथीचे गठ्ठे घेऊन सभेंत आले व तें प्रचंड ओझें त्यांनीं राजाच्या चरणाजवळ नेऊन ठेवलें. रिवाजाप्रमाणें त्यांनीं राजाला अभिवादन केलें. राजानें त्यांचें यथोचित स्वागत केलें व "आपण कोण? कोठून आलांत?" वगैरे प्रश्न विचारले. तेव्हां गुणदेव म्हणाला, "महाराज!

विंध्यारण्यांत राहणाऱ्या पिशाचांपैकीं आम्ही दोघे आहों. माझें नांव गुणदेव व माझ्या मित्राचें नांव नंदिदेव. गुणाढ्य नांवाच्या आमच्या आचार्यांनीं बृहत्कथा नांवाचें एक महाकाव्य रचलें आहे. आपल्या रसिकतेची ख्याति ऐकून आमच्या आचार्यांकडून आम्हीं तें महाकाव्य आपणांकडे आणलें आहे. आपण त्याचा स्वीकार करावा अशी आमच्या आचार्यांची इच्छा आहे."

● ● ●

**गुणाढ्याचा अपमान**

'गुणाढ्य' हें नांव ऐकतांच सातवाहनाच्या डोळ्यापुढून सात वर्षांपूर्वीचा इतिहास झरझर जाऊं लागला. आपल्याला विद्या मिळवून देण्याच्या बाबतींत पैज हरलेला हाच तो गुणाढ्य असावा अशी त्याला शंका आली. संस्कृत, प्राकृत व देशी या तिन्ही भाषांचा त्यानें त्याग केल्याचेंहि त्याला आठवलें. शर्ववर्म्याबद्दल गुणाढ्याच्या मनांत मत्सराची भावना होती याचीहि त्याला आठवण झाली. आपल्या गुरुबद्दल द्वेषबुद्धि बाळगणाऱ्याला उत्तेजन देणें म्हणजे एकप्रकारचा गुरुद्रोह करण्यासारखें आहे असें त्याला वाटूं लागलें. त्यांतून विद्येमुळें त्याला फार गर्वहि झाला होता. त्यामुळें त्यानें आपला बेत बदलला व कांहींशा ताठ्यानेंच त्यानें त्यांना विचारलें, "काय हो ? तुमच्या आचार्यांनीं तिन्ही भाषांचा त्याग केला आहे ना ? मग हें महाकाव्य कोणत्या भाषेंत रचलें आहे ? शिवाय हें इतकें मोठें बाड दिसतें ! तेव्हां याच्या श्लोकांची संख्या तरी किती आहे ?"

त्यावर गुणदेव अभिमानानें म्हणाला, "महाराज ! तिन्ही प्रचालित भाषांचा त्याग केल्यामुळें आचार्यांना हें काव्य आमच्या भाषेंत म्हणजे 'पैशाची' भाषेंत लिहावें लागलें. सतत सात वर्षें खपून त्यांनीं सात लक्ष श्लोक रचले. आचार्यांनीं स्वतःच्या रक्तानें हें सर्व महाकाव्य लिहून काढलें

आहे. याच्या तोडीचें महाकाव्य आपणांस दुसरीकडे पहायलाहि मिळणार नाहीं."

गुणदेवाच्या या शब्दांतून गुणाढ्याबद्दलचा आदर व अभिमान ओतप्रोत ओसंडत होता. पण राजा मात्र कांहींशा उपहासानें म्हणाला, "अरे बापरे! काय म्हणाला? सात लक्ष श्लोक? आणि तेहि गलिच्छ व नीरस अशा तुमच्या भाषेंतील? कोण ढुंकून तरी पाहील का या बाडा-कडे? त्यांत पुनः अमंगळ अशा रक्तानें यांतील पानें कलंकित झालीं आहेत! कोण स्पर्श करील या अपवित्र वस्तूला? उचला हें बाड आणि जा घेऊन तें तुमच्या आचार्यांकडेच."

राजाचा एक एक शब्द दोघांच्याहि जिव्हारीं झोंबत होता. गुरु-जींच्या अपमानामुळें त्यांचा राग अनावर झाला. रागानें त्यांचे चेहरे लालबुंद झाले. हातपाय थरथर कांपूं लागले. अंगाची अगदी लाही लाही झाली. किती उत्साहानें ते राजसभेंत आले होते! आणि आतां? गुरुजींना आपलें काळें तोंड दाखविण्याची त्यांना लाज वाटूं लागली. गुरुजींची इच्छा नसतांनाहि आपण त्यांना येण्याचा आग्रह केला, याबद्दल त्यांना पश्चात्ताप होऊं लागला. गुणदेवाला संताप अनावर झाला व तो ताडकन् राजाला रागानें म्हणाला, "राजा! विद्येच्या व ऐश्वर्याच्या मदानें तूं धुंद झाला आहेस. आमच्या गुरुजींचा भरसभेंत अपमान केल्याबद्दल लवकरच पश्चात्ताप करण्याची पाळी तुझ्यावर येईल. तुला रसिक समज-ण्याचा मूर्खपणा आम्हीं केला तेंच आमचें चुकलें. जातों आम्ही." असें म्हणून त्यानें बृहत्कथेची पोथी उचलली व नंदिदेवासह तो झटकन निघूनहि गेला. भरसभेंत तो राजाचा पाणउतारा करीत असतांना सर्व-जण जागच्या जागींच खिळून राहिले. सर्वांनाच त्या क्षणीं काय करावें हें समजलें नाहीं. दोन्ही शिष्यांच्या नेत्रांतील तेज इतकें प्रखर होतें कीं. त्यांना धक्के देऊन हांकलून देण्याची कोणाचीहि छाती झाली नाहीं. राजा

देखील खजील झाला. पण करणार काय? ते दोघे केव्हांच निघून गेले होते.

• • •

## गुणाढ्याला दुःख

खिन्न अंतःकरणांनीं व जड पावलांनीं गुणदेव व नंदिदेव गुणाढ्याकडे आले. गुणाढ्याचे डोळे त्यांच्याच वाटेकडे लागून राहिले होते. बृहत्कथेची पोथी परत आणलेली पाहून व त्यांच्या मलूल चेहऱ्यांवरून गुणाढ्यानें सर्व कांहीं ताडलें. त्यांनींहि घडलेली सर्व हकीगत थोडक्यांत आपल्या आचार्यांना सांगितली. ती ऐकून गुणाढ्याला अत्यंत वाईट वाटलें. आतां सारें जग आपल्या काव्याचें असेंच चीज करणार काय? हाडाचीं काडें करून व रक्त आटवून सतत सात वर्षं चालविलेल्या लेखनाच्या तपश्चर्येला हेंच फळ यावें ना? इत्यादि विचारांनीं तो अगदीं अस्वस्थ होऊन गेला. काय करावें हेंच मुळीं त्याला सुचेना. बराच वेळ त्यानें विचार केला. शेवटीं कांहीं तरी निश्चय करून तो तेथून उठला. बृहत्कथेची पोथी घेऊन दोन्ही शिष्यांसह तो त्या उपवनांतून निघाला व प्रतिष्ठानापासून जवळच असलेल्या एका पहाडावरील अरण्याचा मार्ग त्यानें धरला. वाटेनें जात असतां सर्वांचीं अंतःकरणें दुःखानें भारावून गेलीं होतीं. कोणी कोणाशीं एक शब्दहि बोलत नव्हतें. एक एक क्षण म्हणजे युगासारख्या वाटत होता. शेवटीं संध्याकाळच्या सुमारास तिघेहि त्या अरण्यांत आले. तेथें एकान्ताची जागा पाहून एका झाडाखालीं त्यांनीं वसति केली. गुरुजींच्या मनांतील पुढील बेत विचारण्याचें धैर्य त्या शिष्यांना झालें नाहीं. अस्वस्थ मनानें सर्वजण झोपीं गेले.

गुणाढ्य दुसरे दिवशीं सकाळीं लवकरच उठला. शेजारच्या झऱ्यावर त्यानें स्नान केलें, उगवत्या सूर्याला अर्घ्य दिले व इष्ट देवतेचें ध्यान

करून तो पुढील उद्योगाला लागला. लवकरच त्यानें पाला-पाचोळा जमा केला. शमीचीं सुकलेलीं लांकडें एकमेकांवर घांसून त्यानें अग्नि पेटविला व बसल्याजागींच एक अग्निकुंड तयार केलें. अग्नीची पूजा केली. जवळच बृहत्कथेची पोथी ठेवून घेतली होती. सूर्याच्या सोनेरी किरणांनीं निबिड अरण्यांतील अंधकार हळूहळू लुप्त होत होता. अग्निकुंडांतील पिंगट ज्वालांचा प्रकाश गुणाढ्याच्या गंभीर चेहऱ्यावर पडला होता. अग्निदेवतेला साक्ष ठेवून त्याच्या पिंगट ज्वालांच्या प्रकाशांत त्यानें आपल्या काव्याचें शेवटचें वाचन सुरू केलें. प्रथम त्याचा कंठ दाटून आला. त्याच्या तोंडून शब्दच उमटेना. मन दगडासारखें वद्द करून, दुःखाचा येणारा उमाळा त्यानें आंतल्या आंत दावून टाकला आणि संथ व गंभीर आवाजांत एक एक श्लोक म्हणायला सुरुवात केली. त्याच्या मुखांतून प्रत्यक्ष सरस्वतीच स्रवत होती. त्याच्या गंभीर पण मंजुळ स्वरानें तें अरण्य दुमदुमून गेलें. तो स्वर ऐकून सकाळच्या वेळीं किलबिलाट करणारे पक्षी एकदम शांत झाले व त्या स्वराच्या रोखानें उड्डाण करीत तेथें आले. गानलुब्ध हरिणींहि टुणटुणु उड्या मारीत गुणाढ्याच्या शेजारीं जमा झालीं. इतर पशूहि तो स्वर ऐकून मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें त्याच्या आवतीं भोंवतीं जमूं लागले. गुणाढ्याच्या शिष्यांना ती कथा कांहीं नवीन नव्हती. पण गुणाढ्य जेव्हां ती गाऊं लागला, तेव्हां तेहि देहभान विसरून ऐकूं लागले. हळूं हळूं आसपासचे लोकहि तेथें जमा होऊं लागले.

• • •

**अक्षय स्वाहा**

गुणाढ्याचें लक्ष यांच्यापैकीं कुणाकडेहि गेलें नाहीं. श्लोक म्हणत असतां त्याच्या नेत्रांतून घळघळां पाणी वाहतच होतें. अंतःकरण पिळवटून त्याचे शब्द बाहेर पडत होते व ऐकणाऱ्याच्या अंतःकरणाचा त

ठाव घेत होते. तसें पाहतां तें काव्य पैशाची भाषेंतील. पण ती भाषा प्राकृतला जवळची असल्यामुळें जमलेल्या श्रोत्यांना आशय समजण्याची मुळींच अडचण वाटत नव्हती. पशुपक्षी तर नादलुब्ध होऊनच ती कथा एकाग्रतेनें ऐकत होते.

गुणाढ्यानें एक पान वाचावें व ' अग्नये स्वाहा ' असें म्हणून तें अग्निदेवतेला अर्पण करावें असा क्रम सारखा चालू होता. प्रथम सुरुवातीलाच गुणदेव व नंदिदेव यांनीं या गोष्टीला विरोध दर्शविला. पण गुणाढ्याच्या निश्चयापुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. ती कथा ऐकण्यासाठीं त्या अरण्याकडे लोकांची रीघ लागली. पशुपक्षीहि आपलें खाणेंपिणें विसरून एकाग्रतेनें जागच्याजागीं खिळून राहिले. काव्यामृताचा आस्वाद घेत असतां सर्वांची तहानभूक हरली खरी, पण अन्नपाणी नसल्यानें सर्वांचीं शरीरें मात्र चोपून गेलीं. कितीतरी दिवस गुणाढ्याचा हा काव्ययज्ञ चालूच होता. सातवाहनाला मात्र या गोष्टीचा पत्ताहि नव्हता.

● ● ●

### सातवाहन अस्वस्थ

सातवाहन राजा अलीकडे राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालीत होता. तो स्वतः प्रजाजनांच्या तक्रारी ऐकून घेत असे व त्यांना न्याय मिळवून देत असे. त्यामुळें तो अत्यंत लोकप्रिय राजा झाला. त्यानें स्वतःची दिनचर्या ठरवून टाकली होती. खाण्यापिण्यांतहि तो अत्यंत नियमित असे. त्यामुळें त्याच्या प्रकृतीची कधींच तक्रार नसे. एके दिवशीं मात्र त्याची प्रकृति एकाएकी बिघडली. पोटदुखीनें तो अगदीं बेजार होऊन गेला. वेदना त्याला असह्य झाल्या व तो बिछान्यावर गडबडां लोळूं लागला. राजवैद्यांना लागलीच बोलावणें गेलें. त्यांनीं लक्षपूर्वक राजाची प्रकृति तपासली. ' शिळें व सुकलेलें मांस खावें लागल्यामुळें प्रकृतींत बिघाड झाला असावा ' असें त्यांनीं निदान केलें व त्यावर त्याला औषध दिलें.

इतका मोठा सार्वभौम राजा ! पण त्याला रसरशीत व ताजें मांसहि मिळूं नये, याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. ' आचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळें आपल्याला हा त्रास सहन करावा लागला ' याचा राजाला फार राग आला. त्यांच्या कामचुकारपणाबद्दल त्यांना कडक शासन करण्याचें त्यानें ठरविलें व चौकशीसाठीं त्यांना लागलीच तेथें हजर राहण्याची आज्ञा दिली. बिचारे आचारी ! मान खालीं घालून ते राजासमोर उभे राहिले. भीतीनें त्यांचें अंग थरथरत होतें. त्यांच्यापैकीं प्रमुख आचाऱ्याकडे वळून राजा कडाडला, " काय रे बल्लवा ! सुकलेलें मांस माझ्या जेवणांत वापरतांना तुला लाज नाहीं वाटली ? निष्काळजीपणानें आपण सम्राटाच्या जिवाशीं खेळ खेळतों याची तुला जाणीव दिसत नाहीं ! या तुझ्या बेपर्वाईबद्दल तुला व तुझ्या सहकाऱ्यांना मी जन्मठेपीची सजा देत आहें." राजाचे हे शब्द ऐकून बल्लवाची भीतीनें गाळणच उडाली. त्याच्या तोंडांतून धड शब्दहि उमटेना. शेवटीं मनाचा हिय्या करून तो राजाला म्हणाला, " महाराज ! या दासाचें म्हणणें आपण ऐकून घ्यावें व चूक आढळून आल्यास मला याहिपेक्षां कडक शिक्षा करावी. आपण नेमलेला खास पारधी आम्हांला जें मांस पुरवितो, त्यांतून उत्तम उत्तम मांस निवडून मगच आम्ही स्वयंपाक बनवितों. पण पारध्याकडून येणारें मांसच मुळांत सुकें व नीरस असतें. आम्हीं अनेकदा तक्रार करून पाहिली पण त्यापेक्षां सरस मांस मिळतच नाहीं असें तो म्हणाला. तेव्हां आमच्याकडून काडीचीहि कसूर झाली नाहीं."

बल्लवाचा हा जबाब ऐकून राजा पारध्यावर खवळला. कारण खास राजासाठीं दररोज दोन्ही वेळां ताजें मांस पुरविण्यासाठीं त्या पारध्याची नेमणूक केलेली होती. राजानें तावडतोब त्या पारध्याला बोलावून आणण्याची आज्ञा केली. सेवकांनीं विलंब न लावतां त्याला तेथें हजर केलें. राजा रागावलेला आहे हें ऐकून त्या पारध्याची घाबरगुंडी उडाली. तो राजमहालांत येऊन हात जोडून राजापुढें उभा राहिला. राजानें त्याला दटावून

विचारलें, " काय रे पारध्या ! रोज ताजें मांस पुरविण्यासाठीं तुझी नेमणूक केली असतां तूं अशी फसवेगिरी करतोस काय ? पूर्वींच मारून टाकलेल्या प्राण्यांचें मांस देऊन तूं सम्राटाशीं बेइमानी केलीस त्याबद्दल मी तुला जन्मठेपीची शिक्षा सुनावीत आहें." राजाचा तो निर्णय ऐकून पारध्याचे पाय भीतीनें लटपटूं लागले. तो भीत भीत राजाला म्हणाला, " महाराज ! माझ्या हातून अशी बेइमानी जन्मांत यापूर्वीं कधीं झाली नाहीं व यापुढेंहि होणार नाहीं. आपल्यासाठीं सरस व ताजें मांस मिळविण्याची माझी जिवापाड धडपड चालूं असते. पण मला तें मिळतच नाहीं. त्याला मी तरी काय करूं ? " " मी तरी काय करूं ? मग मरणालाच तयार हो, " राजा मध्येंच कडाडला. तेव्हां पारधी हात जोडून पुनः म्हणाला, " महाराज ! माझी अडचण आपण प्रथम ऐकून घ्यावी व मग आपण मला हवी ती सजा द्यावी. आनंदानें ती स्वीकारायला मी तयार आहें. महाराज ! चांगली शिकार साधण्यासाठीं किती अरण्यें पालथीं घातलीं ! पण तेथें एक पशु किंवा पक्षी दिसेल तर शपथ ! सर्व पशुपक्षी शेजारच्या पर्वतावर एकत्र जमा झाले आहेत. तेथें गुणाढ्य नांवाचा एक महाकवि आपलें काव्य वाचीत आहे. त्याच्या काव्यांत इतका गोडवा आहे कीं तें ऐकत असतां कोणाचीहि तहानभूक हरपून जावी. त्या ठिकाणीं सर्व पशुपक्षी आपलें हाडवैर विसरून जमा झाले आहेत. खाणेंपिणें सोडून ते कितीतरी दिवस त्याचें काव्य एकाग्रतेनें ऐकत आहेत. त्यामुळें त्यांचीं शरीरें चोपून गेलीं आहेत. त्यांना मारणें माझ्या जिवावर येतें. पण आपल्यासाठीं त्यांतील एखादा निवडक प्राणी मी आणीत असतों. त्यांच्या रोडावलेल्या शरिरांतील मांस रसरशीत कसें असणार ? " पारध्याचें हें भाषण ऐकून सर्वजण आश्चर्यचकित झाले. राजाचा तर त्यावर विश्वासहि बसेना. वैद्यांच्या उपचारामुळें त्याच्या प्रकृतींत थोडीफार सुधारणा झाली होती. तेव्हां स्वतः जाऊन प्रत्यक्ष खात्री करून घ्यावी, असें राजानें

ठरविलें व निवडक लोक बरोबर घेऊन तो त्या अरण्याकडे जायला निघाला. 'प्रकृतींत पूर्ण सुधारणा झाली नसल्यामुळें राजानें आतांच तिकडे जाऊं नये' असें वैद्यांनीं परोपरीनें सांगून पाहिलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

● ● ●

### सातवाहनाचा पश्चात्ताप

गुणाढ्याच्या काव्याचा आपण अनादर केला ही गोष्ट त्याच्या मनाला लागून राहिली होती. पारध्याचें भाषण ऐकून तर तो फारच अस्वस्थ झाला. ज्या काव्यावरून पशुपक्षीहि आपला जीव ओवाळून टाकतात, त्या काव्याची आपण कशी वासलात लावली तें सर्व त्याला आठवूं लागलें. त्यामुळें आतां त्याचें मन त्याला खाऊं लागलें. आपल्या हातून फार मोठ्या पंडिताचा अपमान झाला याची त्याला रुखरुख वाटूं लागली. 'राजा ! तुला पश्चात्ताप करण्याची पाळी येईल' हे गुणदेवाचे शब्द त्याच्या कानांत घुमूं लागले. आपल्या हातून फार मोठी चूक झाली याची त्याला खात्री पटली व त्या चुकीची भरपाई करण्याच्या भूमिकेनें शेवटीं तो तिकडे निघाला.

गुणाढ्याचा शोध करीत राजा पायींच त्या अरण्यांत आला. पण आतां वेळ टळून गेली होती. सात लक्ष श्लोकांपैकीं सहा लक्ष श्लोक अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडले होते. राजाला तेथें जें दृश्य दिसलें तें अपूर्व होतें — एका पवित्र अग्निकुंडासमोर ऋषितुल्य गुणाढ्याची कृश पण तेजस्वी मूर्ति गंभीरपणें बसली आहे. त्या महाकवीच्या हातांत अपूर्व अशा महाकाव्याचें एक पान आहे. गोड व गंभीर स्वरांत तो त्यावरील श्लोक म्हणत आहे. त्याच्या डोळ्यांतून अजूनहि पाणी गळतच आहे. त्याचें काव्य ऐकण्यासाठीं आलेले लोक व पशुपक्षी मंत्रमुग्ध होऊन जागच्या जागीं खिळून गेले आहेत. पानावरील श्लोक

वाचून झाले कीं ' अग्नये स्वाहा ' असें अधिक गंभीरपणें उच्चारीत गुणाढ्य अग्नींत त्या पानाची आहुति टाकीत आहे व जड अंतःकरणानें पुढचें पान उचलीत आहे. — तें करुण दृश्य पाहून राजाला आपल्या मूर्ख-पणाचा पुरेपूर पश्चात्ताप झाला. त्याचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या. धांवत जाऊन त्यानें गुणाढ्याचे पाय धरले व तो त्याच्याकडे क्षमेची याचना करूं लागला. गुणाढ्यानें क्षणभर आपेंल वाचन थांबविलें. शांत नजरेनें त्यानें राजाकडे पाहिलें. राजाला झालेला पश्चात्ताप त्याच्या मुखावर स्पष्ट दिसत होता. तें काव्य ऐकत असलेल्या सर्वांची समाधि भंगली. त्यांचे नेत्र राजावर खिळले. एक सम्राट् एका महाकवीच्या चरणावर लोळण घेऊन क्षमा मागत होता !

पश्चात्तापानें दग्ध झालेल्या राजाकडे पाहून गुणाढ्याचा कंठ दाटून आला. सद्गदित स्वरांत तो राजाला म्हणाला, " राजा ! ऊठ. मी तुझ्या-बद्दल कधींच राग धरला नाहीं. तुला मात्र या काव्याची महती फारच उशिरां कळली. आतां काय उपयोग ? पण एका विद्याधराची कथा अजू-नहि शिल्लक राहिली आहे. ही एक लक्ष श्लोकांची कथा मी तुला अर्पण करीत आहें. ही कथा जरी पैशाची भाषेंत असली तरी माझे हे दोन शिष्य ती तुला स्पष्ट करून सांगतील. " असें म्हणून गुणाढ्यानें गुणदेव व नंदिदेव यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला. गुणदेवाला पाहून राजा फारच खजील झाला. गुणाढ्याच्या सांगण्यावरून दोन्ही शिष्यांनीं त्या कथेचें विवरण करण्याचें मान्य केलें. राजा सर्वांना आपल्या मंदिराकडे येण्याचा आग्रह करूं लागला. तेव्हां तपश्चर्येला जाण्याचा आपला निश्चय सांगून गुणाढ्यानें राजाची समजूत काढली. त्यानें राजाला व आपल्या प्रिय शिष्यांना प्रेमानें आशीर्वाद दिला व त्यांचा निरोप घेतला. आचार्य आपे-ल्याला सोडून जातील याची गुणदेव व नंदिदेव यांना कल्पनाहि नव्हती.

पण गुणाढ्याचा निश्चय ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. ते सर्वजण जड अंतःकरणानें राजधानीकडे परतले.

• • •

## जीवितकार्याची इतिश्री

गुणाढ्याचें जीवितकार्य आतां पुरें झालें होतें. त्याला पूर्वजन्मींची आठवण झाली. देवीच्या सांगण्याप्रमाणें त्यानें काणभूति पिशाचाकडून विद्याधरांच्या कथा ऐकल्या. आपल्या प्रतिभेनें त्या लोकप्रियहि केल्या. पण त्या कथांपैकीं थोड्यांचाच अवशेष लोकांच्या हातीं राहिला. पुढें गुणाढ्यानें तपश्चर्या करून आपलें शरीर कृश केलें व शरीरत्याग करून तो पूर्वीप्रमाणें माल्यवान् नांवाचा गण बनला. त्याच्यापूर्वींच त्याचा मित्र पुष्पदंत शापांतून मुक्त होऊन कैलास पर्वतावर आला होता. ते दोघेहि पूर्वीप्रमाणें शिवपार्वतीची उपासना करीत सुखांत काल कंठूं लागले.

इकडे सातवाहन राजा गुणाढ्याच्या दोन्ही शिष्यांना घेऊन प्रतिष्ठान नगरांत आला. त्यांच्याकडून त्यानें बृहत्कथेचा शिल्लक राहिलेला भाग समजावून घेतला. कथेचे नायक वत्सराज उदयन व त्याचा पुत्र नरवाहनदत्त यांच्या अद्‌भुतरम्य कथा ऐकत असतां, काल कसा निघून जाई हें कोणालाच कळत नसे. राजानें सर्व कथा समजावून घेतली व त्या शिष्यांना खूप संपत्ति देऊन, त्यांचा मानसन्मान केला. राजाला कथा समजावून दिल्यानंतर त्यांनींहि राजाचा निरोप घेतला व ते तपश्चरणासाठीं अरण्यांत निघून गेले. अद्‌भुतरसानें ओथंबलेली ती आश्चर्यकारक कथा सातवाहनामुळें पुढें भरतखंडात लोकप्रिय झाली.

२२४०६
अनुक्रम ... (२४।१)५५
८०२
क्र. ६२४६
दि. ९।। - ५
IRBK-0106275
IRBK-0106275

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित ( १ )
११. दशकुमारचरित ( २ )
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय-नैषध

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

# संस्कृत साहित्य सरिता

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

कालिदासाचें ‘शाकुन्तल’, शूद्रकाचें ‘मृच्छकटिक’ किंवा बाणाची ‘कादम्बरी’ हीं सामान्य मराठी वाचकाच्या दृष्टीनें केवळ ऐकलेलीं नांवें असतात; परंतु त्या नांवांच्या पुस्तकांत काय लिहिलेलें आहे हें थोडक्यांत, सोप्या भाषेंत, चटकन् समजलें तर किती बहार होईल !

❖ ❖ ❖

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचक-वर्ग यांसाठीं

❖ ❖ ❖

संस्कृत वाङ्मय मराठींतून गोष्टीरूपानें.
प्रत्येक काव्य-नाटकाचें स्वतंत्र पुस्तक.
३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ६ आणे.
पुठ्ठयाच्या मजबूत पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें एकत्र संच : १२ रुपये.

★

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.**
**३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.**